Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Volume-3, Issue-11, Dec-2013 Available online at www. isrj.net

# "सोलापूर जिल्ह्यातील शिलालेखांतून दिसणारी चलन व्यवस्था एक दृष्टिक्षेप"

**संतोष बाबरे** , माया पाटील
कला आणि वाणिज्य कॉलेज, पुसेगांव, सातारा.
पुरातत्व विभाग प्रमुख सोलापूर विद्यापिठ, सोलापूर.

***सारांश*** : जोपर्यंत नाणसांच्या पर्यायाने समाजाच्या गरजा सीमित प्रमाणात होत्या, तोपर्यंत वस्तुविनिमयाने त्या भागविल्या जात. परंतु काही व्यवहारात वस्तुविनिमयाने काम भागेना, त्याचघडीला चलनी मुद्रांचा उगम झाला. त्यालाच व्यवहारात नाणी म्हणु लागले, असा इतिहास आहे.[१] देशकालपरत्वे अनेक प्रकाराची, आकाराची व विभिन्न धातुंची नाणी प्रचारात आली. अशा या चलनी नाण्यांची धातुपरत्वे असंख्य नावे आहेत. सोलापूर जिल्ह्यात प्राप्त झालेल्या पुराभिलेखांतुन रायजगदळ गद्यान (अक्कलकोट, इ.स.११२२), गजमल गद्यान (पुळुंज, इ.स.१२००), अंबिली गद्याण (पुळुंज) फक्त गद्याणांचे उल्लेख तर मुबलक प्रमाणात मिळतात.[२] या शिवाय द्रम्म अथवा दम्म, पदमटंक, रुका इत्यादींचाही उल्लेख आहे. यापैकी गद्याण व पदमटंक ही सुवर्ण नाणी होत. यांचे वजन सुमारे तीन, साडेतीन ग्रॅम असे.[३] द्रम्म व दम्म ही बहुधा रजत नाणी असावीत. रुका मात्र तांब्याचे होते. पंढरपूरचा चौऱ्याऐंशीचा शिलालेख या दृष्टीने अभ्यासनिय आहे.[४]

**प्रस्तावना :**

या ठिकाणी आणखी एका विषयाचा पुनरुल्लेख करणे आवश्यक आहे. तत्कालीन प्रचलित नाण्याचे प्रकार व नावे सांगताना रायजगदळ, गद्याण, गजमल गद्याण व कस्तुरी गद्याणांचा उल्लेख केला आहे. गद्याण म्हणजे सुवर्ण नाणे हे सत्य आहे, ङMinted byङ रायजगदळ, गजमल, अंबिलि, कस्तुरी इ.[५]

प्रस्तुत शोध निबंधात सोलापूर जिल्ह्यातील उपलब्ध लेखांतुन अनेक प्रकारच्या नाण्यांचे उल्लेख त्यातील दानविषयक मजकूरात आढळतात. अर्थात या शोधप्रबंधातील सोलापूर जिल्ह्यातील उपलब्ध शिलालेख कोणत्याही एका विशिष्ठ राजघराण्याचे नसल्याने त्यातील नाण्यांच्या उल्लेखावरुन राजकीय इतिहास कळु शकणार नाही हे उघड आहे. तसेच हे नाण्यांचे केवळ उल्लेख आहेत, ती प्रत्यक्षनाणी नाहीत.[६] त्यामुळे नाणकशास्त्राच्या दृष्टीने प्रस्तुत शोधप्रबंधातील नाणक वाचक शब्दांचे महत्व केवळ उल्लेखापलीकडे अधिक नाही. परंतु या लेखांच्याकाळात कोणकोणती नाणी चालु होती, ते जाणुन घेण्याच्या दृष्टीने त्यातील नाण्यांचे उल्लेख एकत्र करणे आवश्यक आहे.

त्याकाळात सोन्याचे नाणे व्यवहारात होते व त्याला गद्याण किंवा गद्याणक म्हणत हे अनेक लेखांवरुन दिसते. ङगद्याणांचाङ संपूर्ण उल्लेख पंढरपुर या लेखात असुन गद्याणाचे ङगङ असे संक्षिप्त रुप तर अनेक लेखांतुन आले आहे. चौऱ्याऐंशीच्या लेखात ङकस्तुरी गद्याणङ (किंवा राजवाडे -वाचनाप्रमाणे ङकशुत्रि गद्याणङ) या नावाचे नाणे उल्लेखीत आहे.[७] ते नेमके कोणते असावे हे कळत नाही. महाराष्ट्रात आभीरांच्या काही चालु असलेल्या मुळच्या क्षत्रपांच्या कार्षापण या नाण्याशी त्यांचा संबंध असणे शक्य आहे.[८] भास्कराचार्यांच्या ङलिलावतीङ या ग्रंथान्वये गद्यानक हे नाणे ४८ गुजांचे असुन त्याचे वजन सद्याच्या अर्धेली इतके असावे.ङलिलावतीङ तील श्लोक असा आहे.

तुल्या यवाभ्या कथितात्र गुञ्जा वल्लस्त्रिगुञ्जो धरणञ्च तेऽष्टौ।
गद्यानकस्तद्द्वयमिन्द्रतुल्यैर्वल्लैस्तथैको घटकः प्रदिष्टः ।। १.३ [९]

गद्याणकाविषयीचे म. मिराशी यांचे टिपण उल्लेखणिय आहे. श्री.खरे यांच्या मताने गद्याण या शब्दाने सोन्याचे नाणे सुचित होत असले तरी, कांही ठिकाणी हा शब्द भुपरिमाण दर्शविते. [१०]

गद्याणनंतर दाम या नाण्याचे उल्लेख द्रम्म, द्रम, दाम, द्रा, द, दा, दां, किंवा द्रम्म या शब्दाची संक्षिप्त रुपे आहेत. पंढरपूरच्या चौऱ्याऐंशीचा सारख्या लेखांतुन ती नित्य वापरले आहेत. [११] काही लेखांतुन या नाण्याचे विशिष्ट प्रकार उल्लेखित आहेत. द्रम्म किंवा दाम हे नाणे रुप्याचे असुन ते प्राचीन ग्रीस मधील ड्रेक्मा (drachma) या नाण्यांच्या वजनाचे, म्हणजे ६७.५ ग्रे., असावे व त्यांचे मुल्य साधारणपणे १ रुपया इतके असावे.[१२] चौऱ्याऐंशीच्या लेखात कोणीतरी ब्राजन्मांतिक रुका १ड दिल्याची नोंद आहे.[१३] महानुभावाच्या स्मृतिस्थळात तहि एका ठिकाणी रुकाड या नाण्यांचा उल्लेख आहे. (स्मृतीस्थळा ११०). त्यावरुन रुका हे एक रुप्याचे नाणे असुन त्याचा संबंध कलचुरि नृप कृष्णराज यांने चालु केलेल्या रुपकड या नाण्यांशी दिसतो.[१४] हे नाणे क्षत्रपाच्या, कार्षापण या रौप्यनाणकाचे अनुकरण करुन कलचुरि नृप कृष्णराज यांने चालु केले. व त्याच्या नावाने ओळखला जाणारा हा कृष्णराज -रुपक त्याच्या नंतर शे-दिडशे वर्षे प्रचलित होता. [१५] वरील पंढरपूर लेखातील व स्मृतीस्थळात तील रुकाड हा या रुपकाड चाच वंशज होय.

अशा प्रकारे सोलापूर जिल्ह्यात प्राप्त झालेल्या पुराभिलेखांतुन रायजगदळ गद्याण व गद्याण आणि पदमटंकसारख्या सुवर्णापासुन तो रुकासारख्या सामान्य पदार्थापर्यंत अनेक आकाराची व विविध मुल्यांची नाणी तत्त्कालीन व्यवहारात रुढ होती. ही सर्व नाणी मिळुन जे द्रव्य होई त्याचा उल्लेख कोरीव लेखांतुन पैक किंवा पैकु या शब्दांने केलेला आहे. उदा. पंढरपुर चौऱ्याऐंशीच्या लेखात ज्नाना भक्तिमालिआ दत्त पैकाचा विवरुध असा स्पष्ट उल्लेख आहे. [१६]

## संदर्भ सूची

१) कोसांबी, डी.डी.,नानकशास्त्र १९६०,पृ.क्र.३५.
२) तुळपुळे, शं.गो., प्राचीन मराठी कोरीव लेख, पुणे विद्यापीठ प्रकाशन, १९६३, पृ.क्र.९०.
३) खरे, ग.ह., दक्षिण महाराष्ट्रातील इतिहास साधने, खंड-२रा, पृ.क्र.५६-६९.
४) तुळपुळे, शं.गो., प्राचीन मराठी कोरीव लेख, पुणे विद्यापीठ प्रकाशन, १९६३, पृ.क्र.८५.
५) Sirkar D.C.Indian Epigraphical glossary Delhi, १९६६ p.p.४२९-४३२.
६) संशोधक, त्रैमासिक,राजवाडे संशोधन मंडळ, धुळे मार्च २००४, पृ.क्र.१७.
७) राजवाडे, वि.का.,पंढरपूर येथील चौऱ्यायशीचा शिलालेख (ग्रंथमाला व२), अं.१.
८) CII, IV, Intro; P.Clxxviii.
९) लीळाचरित्र:एकांक ४१, ५८, पुर्वार्ध ६, ५४, १८५, १८७, २०४ इ.उत्तरार्ध १८८.
१०) खरे, ग.ह., दक्षिण महाराष्ट्रातील इतिहास साधने, खंड-२रा, पृ.क्र.३,२४,२.
११) Deleury G.A. The Cult of Vithoba (Poona,१९६०).
१२) Arch. Survey of India, Western Circle,Report,१८९७-९८,P-५.
१३) खरे, ग.ह.,श्री विठ्ठल आणि पंढरपुर (आ.२री )पृ.क्र.२९-४२, ७३-७७.
१४) सह्याद्री, खंड-३५, पृष्ठ-२५३.
१५) लीळाचरित्र:एकांक ४१, ५८, पुर्वार्ध ६, ५४, १८५, १८७, २०४ इ.उत्तरार्ध १८८.
१६) मिराशी, वा.वि.,पंढरपुरचा शिलालेख, (म.सा.पत्रिका, १.३०,अं ११८).